# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०३.०६.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०२.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून १,६०,३८०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०१ ईसमांवर कारवाई करून ४३५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३७५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,२८,०५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— अंमली पदार्थ ''डोडा पावडर'' बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक ०२.०६.२०२६ चे १९.३० वा. ते २०.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत टेका नाका कडे जाणाऱ्या रोडवर, इंडस्ट्रीयल एरीया, गुरपाल यांचे बांधकाम साईट समोरून सार्वजनिक रोडवर एक संशयीत ईसमांस त्याचे काळ्या रंगाची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस दुचाकी क्र. एम.एच. ४९ बि.क्यु. ५८१४ सह ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव यश नितीन वालदे, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. १९१, लाईन नं. ०३, भिमटे सरांचे घराजवळ, नारी रोड, कपीलनगर, नागपूर असे सांगीतले. एन.डी.पि.एस कायद्याचे तंतोतंत पालन करून, पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन प्लास्टीक पन्नीमध्ये अंमली पदार्थ डोडा (पॉपी स्ट्रॉ) पावडर वजनी एकुण २४९ ग्रॅम मिळुन आली. आरोपीस सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचे साथिदार आरोपी चंदन मंगल साखरे, वय ५० वर्षे, रा. गल्ली नं. ०३, नारी रोड, कपील नगर, नागपुर याचे मदतीने डोडा (पॉपी स्ट्रॉ) पावडर आणल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन डोडा (पॉपी स्ट्रॉ) पावडर, ०१ मोबाईल फोन, दुचाकी असा एकुण ७३,७५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता डोडा (पॉपी

स्ट्रॉ) पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), १५(अ), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपीलनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव कपीलनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपुर शहर चे मा. पोलीस आयुक्त श्री. रविन्द्रकुमार सिंगल, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. राहुल माकणीकर, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. अभिजीत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. युवानंद कडु, नारायण पारवेकर, पोअं. रविंद्र राऊत, विरेंद्र पांडे, निलेश श्रीपात्रे व चालक पोहवा. मनिष मिश्रा यांनी केली.

**३) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक १४.०५.२०२६ चे ००.३० वा. ते ०५.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी कौशीक राजु शिंमणजुडे, वय २८ वर्षे, रा. जाकीर हुसेन वार्ड, गोंदीया, ह.मु.— विश्वकर्मा नगर, गल्ली नं. २, उटकुडे यांचे घरी किरायाने, अजनी, नागपुर यांनी त्यांची पॅशन प्रो दुचाकी क्र. एम.एच. ३१ एफएम ४६७७ किंमती अंदाजे ७०,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, भोले पेट्रोल पंप चौक, संजय ट्रॅव्हल्स ऑफीस समोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी नामे सय्यद सोहेल सय्यद रफीक, वय २० वर्षे, रा. सरवराबाद, प्लॉट नं. २१५, यशोधरानगर, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे ७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी सिताबर्डी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपुर शहरचे मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. राहुल माकणीकर, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. अभिजीत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली, वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.



(गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०२.०६.२०२६ चे १९.१५ वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत राजीव नगर वस्ती, शुभम नगर येथे राहणारा हद्दपार ईसम नामे निलेश उर्फ गझनी शिलानाथ शहा, वय २७ वर्षे यास राहते घरी चेक केले असता, तो मिळुन आला. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२५, दिनांक २४.०४.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोअं. निलेश दुबे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. दिलीप थोरवे ९५२७४२७८४६ यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म. पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कपीलनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.०६.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०२.०६.२०२६ चे ०८.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, प्लॉट नं. १९, एकता नगर कॉलोनी, उप्पलवाडी, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. कल्याणी रॉबीन फुलसुंगे, वय ३७ वर्षे ह्या आपले राहते घराला आतुन कुलुप लावुन घरात परिवारासह झोपल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, दोन बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ३९,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने, गॅस रेगुलेटर, टायटन घडी असा एकुण किंमती १,८३,८८५/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि. शंकर निलपत्रेवार ९८८११२६९०२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(२), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट</u>

वाहतूक परिमंडळ सिताबर्डी नागपूर शहर हद्दीतील महा. मेट्रो तर्फे मे. YFC & BBG Projects कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) पर्यंत भुयार मार्गाचे बांधकाम सतत ०१ वर्षात करण्यात येणार आहे. सदरच्या मार्गावर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये. तसेच, रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता नमुद रस्त्यावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडुन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतुक ही डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक येथुन उजवे वळण घेवुन पुढे महाराजबाग चौकातुन सोयीनुसार जातील किंवा झिरो माईल येथुन डावे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे इन्स्टीट्युट ऑफ सायन्स चौकाकडे जातील.

**इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतुक महाराजबाग चौकातुन डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक मार्गे फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) कडे जातील किंवा बोर्ड ऑफिस चौक येथुन उजवे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे झिरो माईल येथुन उजवे वळण घेवुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) चौकाकडे जातील

**सदर अधिसुचना दिनांक ०४.०६.२०२६ पासून ते दिनांक ०३.०७.२०२६ रोजी पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**

**(आदित्य मिरखेलकर, भापोसे.)**

पोलीस उप आयुक्त,वाहतुक,

नागपूर शहर